## निशाणी ३५ वरील आदेश

०१. सदरचा अर्ज दिवाणी व्यवहार संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे अर्जदारांना दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करुन घेण्यात यावे याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा पारस नंद यांनी दिनांक १३.०२.२०१४ रोजी केलेल्या कथित कराराची पुर्तता करुन मिळावी आणि राहिलेली कराराची रक्कम रुपये ७,००,०००/- स्वीकारुन वादीच्या हक्कात खरेदीखत करुन दयावे व वादीने खरेदी केलेल्या जमीनीत कोणीही अडी अडथळा करु नये याकरीता कायमस्वरुपी मनाई हुकुम प्रतिवादींविरुध्द देण्यात यावा यासाठी दावा दाखल केला आहे.

०३. दाव्याचे समन्स प्रतिवादींना गेल्यानंतर प्रतिवादी क्र.१ हि दिनांक ०१.०५.२०१४ रोजी मयत झाली असल्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला आहे. थोडक्यात प्रतिवादी ही दावा दाखल करण्यापुर्वीच मयत झाली असल्याने मयत व्यक्ती विरुध्द दावा दाखल करणे योग्य आहे किंवा नाही याबाबत वादीने खुलासा सादर करावा असा आदेश न्यायालयाने निशाणी १ वर पारित केला आहे.

०४. त्यानंतर वादीने पिरकल्याण येथील एक व्यक्ती पुंजाराम घोलप यास हाताशी धरुन, त्याच्याशी संगणमत करुन, त्याच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन कायदयाअंतर्गत मयत प्रयागबाई हिचे वारस असल्याचे प्रमाणपत्र न्यायालयातून हस्तगत करुन तिचे वारस म्हणून दाव्याकामी पुंजाराम घोलप

याचे नाव समाविष्ट केले आहे. वास्तविक सदरचे अर्जदार मयत प्रयागबाई हिचे खरे वारस आहेत. पुंजाराम हा मयत प्रयागबाई हिचा वारस कधीही नव्हता व नाही.

०५. सदरची बाब अर्जदारांना समजली तेव्हा त्यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३६२/२०२१ अन्वये पुंजाराम यास न्यायालयाकडून देण्यात आलेले वारस प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत भारतीय वारसा कायदा कलम ३८३ प्रमाणे दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५०/२०२३ दाखल केला आहे आणि सध्या तो अर्ज प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम ३ व ७ प्रमाणे दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१५५/२०२३ दाखल केला असून तो देखील प्रलंबित आहे. अशाप्रकारे अर्जदार हेच मयत प्रयागबाई हिचे एकमेव वारस असून पुंजाराम याच्यासोबत तिचे काहीही नातेसंबंध नव्हते व नाही. त्यामुळे त्यांना दाव्याकामी प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

०६. अर्जदार क्र.१ हे अत्यंत वयस्कर आहे आणि अर्जदार क्र.२ व ३ या त्यांच्या कौटुंबिक अडचणींमुळे न्यायालयात हजर राहु शकत नाहीत. म्हणून त्यांनी त्यांच्या जवळचे नातेवाईक आणि विश्वासू व्यक्ती भगवान विठ्ठलराव फुलझाडे यास कुलमुख्यत्यार म्हणून नियुक्त केले आहे. अर्जासोबत कुलमुख्यत्यारपत्राची प्रत देखील सादर केली आहे. त्यामुळे सदर अर्जदारांना प्रतिवादी म्हणून त्यांना समाविष्ट करण्यात यावे याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्ज दिनांक ०७.०८.२०२४ रोजी दाखल केल्यानंतर त्यावर वादी आणि प्रतिवादींचे म्हणणे मागवण्यात आले. परंतु दिनांक

०४.१०.२०२४ पर्यत वादी आणि प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल न केल्याने सदरचा अर्ज त्यांच्या विरुध्द विना म्हणणे पुढे चालविण्यात आला आहे.

०७. अर्जासोबत अर्जदारांनी भगवान फुलझाडे यांच्या नावे करुन दिलेले कुलमुख्यत्यार पत्र दाखल केले आहे. दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१५०/२०२३ आणि दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१५५/२०२३ यांचा निकाल अदयापपावेतो लागला नाही असे दिसून येते. दावा मिळकत मौजे पिरकल्याण ता. जि. जालना येथील गट क्र. ३२, क्षेत्रफळ २ हे. २ आर मध्ये अर्जदारांचा हक्क व हितसंबंध आहे असे अर्जामध्ये नमूद करण्यात आले आहे.

०८. मयत प्रयागबाई हिचा वारस पुंजाराम सखाराम घोलप हा दिनांक २९.०९.२०२३ रोजी स्वतः हुन दाव्याकामी हजर झालेला आहे आणि त्यास निशाणी ३० प्रमाणे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ३ व ७ नुसार दाखल दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३६२/२०२१ मधील आदेशानुसार तसेच मयत प्रयागबाई हिचा तो वारस असल्याने दाव्याकामी मयत प्रतिवादीचा वारस म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. सदरचे वारस प्रमाणपत्र रद्द करुन मिळावे या करीता दाखल अर्ज प्रलंबित आहे. अर्जदारांचे असेही कथन आहे की तेच मयत प्रयागबाई हिचे वारस आहेत.

०९. अशा परिस्थीतीत अर्जदार यांना दाव्याकामी प्रतिवादी म्हणून समाविष्ट करुन घेतल्यास पुंजाराम घोलप यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. मयत प्रयागबाई हिचे वारस कोण आहेत हे प्रलंबित प्रकरणामध्ये निश्चित झाल्यावर त्या अनुषंगाने दाव्यामध्ये बदल करता येवू शकतो. परंतु दाव्याची सदयस्थिती पाहता दिवाणी किरकोळ अर्जांचा निकाल लागेपर्यत सदरचे

प्रकरण प्रलंबित ठेवणे योग्य नाही. अर्ज नामंजूर केल्यास अर्जदारांना त्यांच्या दावा मिळकतीतील हक्क अधिकारापासून वंचित राहावे लागेल. त्यामुळे त्यांना दाव्याकामी प्रतिवादी पक्षकार म्हणून सामील करणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. निशाणी ३५ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार क्र.१ ते ३ यांना दाव्याकामी प्रतिवादी क्र.२ ते ४ म्हणून समाविष्ट करण्यात येत आहे.

०३. वादीने आदेशाप्रमाणे दाव्यामध्ये मुदतीत दुरुस्ती करावी.

०४. अर्जाचा खर्च पक्षकारांनी आपापला सोसावा.

DIPALI MANOHAR SHINDE

Digitally signed by DIPALI MANOHAR SHINDE
Date: 2024.11.29 11:19:24 +0530

(**श्रीमती डि. एम. शिंदे**)

दिनांकः– २७.११.२०२४

५ वे सह दिवाणी न्यायाधीश,
(व. स्तर), जालना.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी. डी. एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : ए. एस. जोशी
न्यायालयाचे नांव : ५ वे सह दिवाणी न्यायालय, (व.स्तर) जालना.
निकाल दिनांक : २७.११.२०२४

स्वा/-
(ए. एस. जोशी)
लघुलेखक